# तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे यांचे कार्यालय

**पत्रव्यवहाराचा पत्ता : ठाणे स्टेशन रोड, ठाणे (प.), तालुका व जिल्हा ठाणे, पिन कोड : ४०० ६०१**

**दूरध्वनी क्रमांक ०२२ २५३३११६४ ई मेल आयडी : tahthane@gmail.com**


---

क्र.महसुल/क-१/टे-२/जमिनबाब/कावि-६५/२०१९ /१०९१ दिनांक: ०५/११/२०१९

प्रति,

मा.जिल्हाधिकारी, ठाणे
(महसुल शाखा)

विषय : Dumping to claim mangrove land thane

संदर्भ : कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती यांचेकडील तक्रार क्र.६५

उपरोक्त विषयाबाबत श्री.सुबीर वर्मा यांनी मा.सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती यांचेकडे सादर केलेली तक्रार ई- मेल द्वारे या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी बाळकुम यांनी अर्जदार यांचे समवेत दि.२९/०६/२०१९ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असता सदर जमिनीवर मोठ्या प्रमाणात डेब्रिजचा भरणा केलेला असुन जमीन भरणी करत पुढे पुढे वाढवत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. याबाबत geo- tagging चे फोटो सादर केलेले आहेत.

तसेच उपरोक्त विषयाबाबत तक्रार क्र. 80- श्री.बद्री चॅटर्जी यांनी यापूर्वी सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील पत्र क्र.महसुल/क-1/टे-2/जमीनबाब/कावि-17625/2018/1662, दि.11/12/2018 अन्वये अहवाल सादर करणेत आलेला आहे.

त्याअनुषंगाने समितीने दि.२०/९/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

- या ठिकाणी २००५ साली कांदळवन होते का याबाबत माहिती नाही. परंतू २००५ च्या गुगल इमेजनुसार सदर ठिकाणी भात शेती दिसत आहे.
- तसेच शहर विकास विभागाच्या अभिप्रायानुसार सदर भूखंडांबाबत शासनाकडून प्राप्त झालेल्या २००५ सालचे CZMP नकाशानुसार मौजे भाईंदरपाडा स.नं.३७ पै या जमिनीचे क्षेत्र CRZ च्या तरतुदीने बाधित नाही.
- त्यानुसार समितीने दि.२०/०९/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये सदर ठिकाणी कांदळवनाची लागवड करण्यास समितीने ठाणे महानगरपालिकेला निर्देश दिले.

हे आपल्या माहितीसाठी सविनय सादर.

Received
9/12/2019

(अधिक पाटील)
तहसीलदार ठाणे

प्रत :- मा.सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

प्रत : मा.उपविभागीय अधिकारी, ठाणे विभाग, ठाणे यांचेकडे सविनय सादर.